**कृपया प्रसिद्धीसाठी** **9 नोव्हेंबर 2010**

## ‘आदर्श’ घोटाळा प्रकरणी संसदीय चौकशी समिती नेमा : राम नाईक

**मुंबई, मंगळवार :** मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांचा राजीनामा पुरेसा नाही, ‘आदर्श’ घोटाळ्यात मुख्यमंत्र्यांप्रमाणेच आणखीही मंत्री, उच्चपदस्थ सनदी व सेना अधिकारी गुंतलेले आहेत. या संपूर्ण घोटाळ्याची सर्वंकष चौकशी करण्यासाठी सर्वपक्षीय संसदीय चौकशी समिती नेमली पाहिले, अशी मागणी माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी केली आहे.

केवळ श्री. अशोक चव्हाण यांना मुख्यमंत्री पदावरुन हटवून आदर्श घोटाळा प्रकरणावर पडदा टाकण्याचा काँग्रेसचा मनसुबा भाजपा पूर्ण होऊ देणार नाही. आदर्श घोटाळ्यामध्ये महाराष्ट्र मंत्रीमंडळातील अनेक मंत्री, केंद्रीय मंत्री, उच्चपदस्थ सेना अधिकारी व सनदी अधिकारीही सहभागी आहेत. यात सीआरझेडचेही उल्लंघन झाले हे स्पष्ट झाले आहे. एकापरीने मुख्यमंत्र्यांचा राजीनामा स्वीकारुन आदर्श घोटाळा झाल्याची कबुलीच काँग्रेसने दिली आहे. आता या प्रकरणाची संपूर्ण तड लावणे गरजेचे आहे. कारगील हुतात्म्यांचे कुटुंबिय, देशाची सुरक्षा यामध्ये दावणीला बांधली गेली. संपूर्ण प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यासाठी सर्वपक्षीय संसदीय चौकशी समिती नेमण्यात यावी, अशी मागणी श्री. नाईक यांनी केली आहे.

**(कार्यालय सचिव)**